महाराष्ट्र शासन
उद्योगसंचालनालय
# जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग
मुख्य प्रशासकीय इमारत, ए ब्लॉक, दुसरा मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग-416812.
E-mail:-didic.sindhudurg@maharashtra.gov.inदूरध्वनी (02362) 228705 / 228662.

## जिल्हा निर्यात प्रचलन समिती बैठक दि.२७/०७/२०२३— इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचलन समितीची बैठक दि.२७/०७/२०२३दुपारी १२.१५ वा. मा.उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखालीजिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांचे दालनात संपन्न झाली.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग तथा निमंत्रक, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्षांचे अनुमतीने सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात आली.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग तथा निमंत्रक यांनी शासनाने नव्याने गठित केलेली राज्य निर्यात प्रचलन परिषद व त्याअंतर्गत गठित केलेली जिल्हा निर्यात प्रचलन समितीची कार्ये व उद्दिष्टे याबाबत सर्वांना माहिती दिली. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातून सध्या निर्यात होणा-या विविध प्रकारच्या मालाबाबतची संबंधित अभिकरण संस्थांकडून प्राप्त झालेली आकडेवारी तसेच निर्यातीचे दृष्टीने जिल्हयामध्ये उपलब्ध असलेली मूलभूत सुविधा याबाबतची माहिती सर्वांसमोर सादर केली.

सदरचे चित्र पहाता सिंधुदुर्ग जिल्हयामधून होणारी विविध मालाची निर्यात अत्यल्प असूननिर्यातवाढीस भरपूर वाव असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले.तसेच, निर्यातक्षम वस्तूंची उपलब्धता असणारे उद्योग, व्यक्ती व संस्था यांना निर्यात करणे शक्य व्हावे यासाठी Handholding Support ची आवश्यकताही मा.अध्यक्षांनी व्यक्त केली.सदरचे चित्र बदलणेसाठी या समितीच्या सदस्यसंस्थां कशाप्रकारे स्वतः भूमिका निभावू शकतात याबाबतचा तपशील यंत्रणांनी मांडावा व समितीतील सहभागी औद्योगिक संस्थांनी त्यांना निर्यात वाढविणेचे दृष्टीने

कोणत्या गोष्टी होणे आवश्यक वाटते याबाबत निवेदन करावे जेणेकरुन यापुढील कालावधीत करावयाच्या नेमक्या उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल असेही मा.अध्यक्षांनी सूचित केले.

निर्यातवाढीसाठी NABL Accreditation Lab ची उभारणा करण्याबाबत वLab Technician ची उपलब्धतता करण्याबाबतच्या शक्यता पडताळण्यात आल्या.

Export Consultant हा कोर्स निर्माण करुन निर्यातदारांच्या मार्गदर्शनासाठी Consultant तयार करण्याचे व त्यासाठी आवश्यक पर्याय तपासण्याचे सुचविण्यात आले.

ExportShipment विषयातील तज्ञ बैठकीत उपस्थित असल्याने त्यांच्याकडून Goa, Mumbai, Middle East, Europe येथील ExportShipment बाबत माहिती देण्यात आली व निर्यातदारांना प्रवृत्त करण्याचे व निर्यात वाढीसाठी प्रयत्न करण्याचे सुचविण्यात आले.

श्री.सावंत - कौशल्य विभाग- उदयोगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी उदयोग क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार प्रशिक्षण मोडयुल तयार करुन त्याची अंमलबजावणी जिल्हयांत करणे बाबत कौशल्य विकास विभागाच्या अधिका-यांनी सभासदांना माहिती दिली.

MPEDA-प्रतिनिधी उपस्थित-सागरी उत्पादन निर्यातवाढीसाठी विभागाच्या योजनां विषयी माहिती सभागृहाला सांगितली.

दि. २१/०६/२०२३ रोजी संपन्न बैठकीतील सर्व मुद्यांवर चर्चा होऊन कार्यवाही करण्यात आली.

(एस.एस.दामले)
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र तथा
निमंत्रक, जिल्हा निर्यात प्रचलन समिती, सिंधुदुर्ग.

( श्री.रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारीतथा
प्रतिनिधी- अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती, सिंधुदुर्ग.

F:\27032023\DEPC Meeting_27 07 2023_Minutes.docx